# कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णीच्या वतीने मौजे मार्कड व खडकूत ता.अर्धापूर येथे 'स्वच्छता ही सेवा' जनजागृती अभियान संपन्न

"स्वच्छ परिसर, निरोगी आयुष्य आणि समृद्ध समाज" या मुख्य उद्देशांतर्गत कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेडच्या वतीने मौजे मार्कड व खडकूत (ता. अर्धापूर) येथे 'स्वच्छता ही सेवा' जनजागृती अभियानाचे यशस्वी आयोजन डॉ. देविकांत देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली डॉ. अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ) यांनी केले.या विशेष मोहिमेदरम्यान पोस्टर प्रदर्शन आणि मार्गदर्शनाद्वारे ग्रामीण भागात व शेतशिवारात स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात आकर्षक पोस्टर व फलकांच्या माध्यमातून करण्यात आली. या पोस्टर्सवर कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, प्लॅस्टिकमुक्ती आणि वैयक्तिक आरोग्याविषयीचे संदेश प्रभावीपणे मांडण्यात आले होते. यावेळी प्रा. माणिक कल्याणकर (पिक संरक्षण तज्ञ) प्रा. संदीप जायभाये (कृषि विद्या तज्ञ) प्रा. अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ) डॉ. अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ) यांनी उपस्थित शेतकरी, महिला आणि ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

**अभियानातील प्रमुख उपक्रम व मार्गदर्शन:**

* पोस्टर व फलकांद्वारे जनजागृती: गावात विविध ठिकाणी स्वच्छता संदेश देणारे आकर्षक पोस्टर लावून ग्रामस्थांचे लक्ष वेधण्यात आले.

* कचरा व्यवस्थापन मार्गदर्शन: घरात व शिवारामध्ये निघणारा ओला कचरा आणि सुका कचरा वेगवेगळा करून खतनिर्मिती कशी करावी, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

* प्लास्टिक मुक्तीचा संकल्प: सिंगल-यूझ प्लॅस्टिकचा वापर पूर्णपणे टाळून कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

* श्रमदान व परिसर स्वच्छता: गावातील सार्वजनिक ठिकाणे व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी ग्रामस्थांनी सामूहिक श्रमदान केले.

या अभियानाला मौजे मार्कड व खडकूत येथील शेतकरी, महिला बचत गटांच्या सदस्या आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी चे श्री. संतोष वाघमारे यांचे विशेष सहकार्य लाभले.उपक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी आपला परिसर नेहमी स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा सामूहिक संकल्प केला.


भीम गर्जना
शेतकरी गट, दिग्रस (नां)
फार्मर कप स्पर्धा
भीम गर्जना शेतकरी गट, दिग्रस (नां)
कृषिविज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड-१
स्वच्छता ही सेवा अभियान


भीम गर्जना
शेतकरी गट, दिग्रस (नां)
फार्मर कप स्पर्धा
भीम गर्जना शेतकरी गट, दिग्रस (नां)
कृषिविज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड-१
स्वच्छता ही सेवा अभियान

